# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

**शासकीय तंत्रनिकेतनच्या बाजुला, उस्मानपुरा**
**पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५**
**(०२४०)२३३४२१६, २३३४७६९(O) Fax-२३५६८२०**
**http://www.dteau.org roaurangabad.dte@gmail.com**


**तात्काळ/प्रथम प्राधान्याने**

**जा.क्र.विकाऔ/आस्था-१/२०१७/** 98CC
**दिनांक :-** 29 APR 2017

प्रति,
**प्राचार्य,**
शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय,औरंगाबाद,
**प्राचार्य,**
शासकीय तंत्रनिकेतन,
औरंगाबाद/जालना/अंबड/जितूर/नांदेड/हिंगोली/बीड/पु.ला.शा.तं.लातूर/शा.नि.म.तं,लातूर/उस्तानाबाद.

**विषय** :- कंत्राटी अध्यापंकाच्या नियुक्ती/सेवानियमीत करण्याबाबतच्या चौकशी/समितीस पडताळणीकरीता मुळ दस्तावेज बाबत.

**संदर्भ** :- १ मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.४अ/आस्था/कं.मा./२०१७/३६९, दि.२१/०४/२०१७
२ चौकशी अधिकारी मा. डॉ. प्रविण गेडाम, भा.प्र.से. यांनी दि. २७/०४/२०१७ रोजी दिलेल्या सुचना/आदेश.

वरील संदर्भिय विषयान्वये कंत्राटी अध्यापकांच्या सेवा नियमीत करताना अनियमितता झाली किंवा कसे याबाबतची सखोल चौकशी करण्याकरीता मा. प्रविण गेडाम, भा.प्र.से यांना नियमीत झालेल्या कंत्राटी अधिव्याख्यात्यांविषयक मुळ दस्तावेज तपासणी करीता उपलब्ध करुन द्यावयाचे आदेश आहेत.

त्यानुषंगाने शासन निर्णय दि.१४/०१/२०१५, दि.१३/०३/२०१५ (अ व ब) व दि.२१/०३/२०१६ अन्वये तंत्रशिक्षण विभागात कंत्राटी/अस्थायी स्वरुपात कार्यरत विविध संस्थेतील अधिव्याख्यात्यांच्या सेवा नियमीत करण्यात आल्या. सदरील अधिव्याख्यात्यांचे कंत्राटी नियुक्तीचे आदेश, मुळ रुजू अहवाल, मुळ कार्यमुक्ती आदेश, मुळ हजेरीपट, तसेच कंत्राटी नियुक्ती काळातील प्रथम नियुक्ती पासूनचे वेतन अदा केलेले मुळ पगार पत्रक अथवा मुळ पगार वाटप रजिस्टर (Acquantas Roll) चौकशी समितीस दि.०४/०५/२०१७ रोजी उपलब्ध करुन दयावे.

जे कंत्राटी अधिव्याख्याता अन्य संस्थेत बदलून गेलेले आहेत त्यांचेही मुळ दस्तावेज दि.०४/०५/२०१७ रोजी समितीस सादर करावयाचे आहे.

तसेच आपल्या संस्थेतील कार्यरत नियमीत झालेले कंत्राटी/अस्थायी अधिव्याख्यात्यांचे मुळ दस्तावेज(हजेरीपट,प्रथम नियुक्ती आदेश, रुजू अहवाल, कार्यमुक्ती आदेश, गैरहजेरीचा तपशील कारणांसह) संबंधीत विभागाच्या प्रशासकीय अधिकारी यांना पत्र देऊन व प्रत संबंधीत संस्थेस देऊन दि.०४/०५/२०१७ रोजी समितीस उपलब्ध करुन द्यावा.

चौकशी समितीस दस्तावेज सादर करताना आवश्यक मुळ दस्तावेजच व्यवस्थीत सादर करावेत व शक्यतो एकच कार्यक्षम कर्मचाऱ्यांची संचालनालयात नियुक्ती करावी.

**(महेश शिवणकर)**
**प्र.सहसंचालक,**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद**

प्रत : या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर अपलोड करण्यास्तव.